दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २४२ वा | बुधवार दि. २८ जून २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६


## उद्धव ठाकरे, संजय राऊतांच्या अडचणीत वाढ

**मुंबई** । शिवसेनेचे खासदार राहुल शेवाळे यांनी दाखल केलेल्या मानहानी याचिका प्रकरणात न्यायालयाकडून शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांना न्यायालयाकडून समन्स बजावण्यात आला आहे. न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सामना या वृत्तपत्रात आपल्याबद्दल बदनामीकारक मजकूर छापण्यात आल्याचा आरोप शिवसेनेचे खासदार राहुल शेवाळे यांनी केला होता. याविरोधात त्यांच्याकडून मानहानीची याचिका दाखल करण्यात आली होती.



## न्यूज कॉलम

### बनावट सौदा पावतीद्वारे फसवणूक

**धुळे** । मालमत्तेवरील बोजा लपवून बनावट सौदा पावतीद्वारे ४० लाख रुपयांची फसवणूक करणार्या दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. मनोज गुलाबराव नाशिककर दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दिनेश मदनलाल शहा, चंचलाबेन दिनेश शहा यांनी सदर मिळकतीवर फायनान्स कर्जाचा तसेच जीएसटी विभागाचा बोजा असल्याची खरी माहित लपवून ठेऊन आमची फसवणूक व विश्वासघात केला आहे. तसेच वरील व्यवहार पूर्ण न करता आमचे पैसे घेऊन वरील दोघे पळून गेले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

### अॅपे रिक्षा उलटल्याने चालक जागीच ठार

**शिरपूर** । तालुक्यातील थाळनेर पेट्रोल पंपाजवळ भरधाव वेगाने जाणारी अॅपे रिक्षा उलटल्याने घडलेल्या अपघातात अॅपे रिक्षा चालक ठार झाल्याची घटना काल सकाळी घडली. समाधान बापू कोळी हा इसम त्याच्या ताब्यातील अॅपे रिक्षा थाळनेर पेट्रोल पंपाजवळून भरधाव वेगाने नेत असतांना त्याचे रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने ती उलटली.

# तोंड काळे केले नसते तर झेंडे दाखवायची वेळ आली नसती

### उपमुख्यमंत्री फडणवीसांचा खडसेंवर हल्लाबोल

**जळगाव । प्रतिनिधी**

पंतप्रधान मोदीं यांच्यामुळे देशभरात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई होत आहे. मोदी पंतप्रधान राहिले तर अनेक घोटाळे बाहेर येतील. आपले सांगाडे बाहेर येतील हे लक्षात आल्यामुळे विरोधक सर्व एकत्र आले आहेत. असा हल्लाबोल देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केला आहे. यावेळी ते जळगावमध्ये बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, जनता ही नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आहे. काळे झेंडे दाखवून काय मिळणार आहे. खडसेंना आता नवीन मालक मिळाला आहे. जमिनीत तोंड काळे केलं नसत तर आज काळे झेंडे दाखवण्याची वेळ खडसे यांच्यावर आली नसती, अशी तीव्र शब्दात त्यांनी टीका केली आहे. परिवारात राहिले असते तर अशा प्रकारे काळे झेंडे दाखवण्याची वेळ खडसे यांच्यावर आले नसते. आम्ही अशा काळे झेंडे दाखवणाऱ्यांना घाबरत नाही. काळे झेंडे किती दाखवले तरी जनता आमच्या सोबत आहे. जळगावची जनता सुद्धा आमच्या सोबतच आहे. कुठल्याही अधिकारी कर्मचारी तसेच नागरिकांवर सक्ती करण्यात आलेली नाही हे मूर्खासारखे आरोप आहेत. आधीचं सरकार हे फेसबुकला विचारच्या माध्यमातून जनतेसमोर जात होते, आम्ही जनतेमध्ये जाऊन लाईव्ह येत आहोत, असेही फडणवीस म्हणाले. अनिल परब यांच्यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, ज्यांनी अशा प्रकारचे काम केलं आहे, त्यांच्यावर कारवाई झाली आहे. तो मग कोणत्या पक्षाचा व्यक्ती आहे, हे महत्त्वाचं नाही. कायदा कोणीही हातात घेऊ शकत नाही. त्यामुळे कारवाई ही प्रत्येकावरच होईल. अधिकारी यांच्यावर कोणी हात उचलेल अशा प्रत्येकावर कारवाई होणारच, असे ते म्हणाले.

मंत्री गिरीश महाजन यांच्या तर्फे देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करण्यात आले. अशा काळ्या झेंड्यांना घाबरणारे आम्ही नाही. एकनाथ खडसेंनी तोंड काळे केले नसते तर त्यांना नवीन मालकाकडे जावे लागले नसते. त्यांना आपल्या परिवारात राहता आले असते. आम्ही जनतेची लोक आहोत. जनतेसाठी काम करत आहोत, जनतेला फायदा देण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. आणि जळगावची जनता आमच्या सोबत आहे, असा दावा देखील देवेंद्र फडणवीस यांनी केला.



### जनता नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी

**मोदीजी यांच्यामुळे देशभरात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई होत आहे. नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान राहिले, तर अनेक घोटाळे बाहेर येतील. आपले सांगाडे बाहेर येतील हे लक्षात आल्यामुळे विरोधक सर्व एकत्र आले असल्याचा हल्लाबोल देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केला आहे.**

### कारवाई ही प्रत्येकावरच होईल

**ज्यांनी अशा प्रकारचं काम केलं आहे. त्यांच्यावर कारवाई झाली आहे. तुम्ही कोणत्या पक्षाचे व्यक्ती आहे हे महत्त्वाचे नाही. कायदा कोणीही हातात घेऊ शकत नाही. त्यामुळे कारवाई ही प्रत्येकावरच होईल.**

### ते मुर्खपणाचे आरोप

**शासन आपल्या दारी प्रत्येक जिल्ह्यामध्ये होत आहे. लाखो लोक त्या ठिकाणी येत आहेत. तुम्ही लाखो लोकांना मूर्ख बनवू शकत नाही. असे मत फडणवीस यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला येण्यासाठी दबाव टाकण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला होता. त्याला त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. नागरिकांची काम होत आहेत, सर्वांना कनेक्टिव्हिटी मिळत आहे, मागील सरकार हे दरवाजात बंद होते, ते फेसबुक लाईव्ह करत होते, आम्ही जनतेत लाईव्ह आहोत. आम्ही लोकांची कामे करत आहोत, त्यामुळे काही लोकांची मळमळ होते, ती बाहेर निघते आणि अशा प्रकारचे आरोप होत असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

### अॅड.रोहिणी खडसे यांना अटक

**राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज शासन आपल्या दारी या उपक्रमासाठी जळगाव दौरावर आले आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार एकनाथराव खडसे यांनी विविध मागण्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालया बाहेर पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. या ठिकाणी पोलिस अधीक्षक एम राजकुमार यांनी देखील भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात सुरू असलेल्या बैठकीतून जिल्हा बँकेच्या माजी अध्यक्ष रोहिणी खडसे यांना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली.**

# मुंबई पोलिसांचा उद्धव ठाकरेंना झटका, मोर्चाला परवानगी नाकारली

### शिष्टमंडळ पोलिस आयुक्तांना भेटणार

**मुंबई । प्रतिनिधी**

आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वात येत्या १ जुलै रोजी मुंबई महापालिकेवर काढण्यात येणाऱ्या भव्य मोर्चाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. यामुळे शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाला जबर झटका बसला आहे. ठाकरे गटाकडून या मोर्चाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. त्याचा टीझरही रिलीजही करण्यात आला आहे. पण मुंबई पोलिसांनी परवानगीच नाकारल्याने ठाकरेंची मोठी गोची झाली आहे. या प्रकरणी पक्षाचे एक शिष्टमंडळ लवकरच मुंबई पोलिस आयुक्तांची भेट घेणार आहे.

मुंबई महापालिकेच्या कथित कोविड सेंटर घोटाळ्याप्रकरणी ही कारवाई सुरु आहे. या प्रकरणात युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांचे निकटवर्तीय सुरज चव्हाण हे अडचणीत आले आहेत. तसेच खासदार संजय राऊत यांचे निकटवर्तीय देखील अडचणीत आले आहेत. शिवसेना भवनात आयोजित पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी मुंबईला कुणी मायबाप राहिलेले नाही. सध्या लुटारूंच राज्य सुरू आहे, अशी टीकाही उद्धव ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर केली. तसेच, मुंबई पालिकेत सध्या प्रचंड भ्रष्टाचार सुरू आहेत. त्याला वाचा फोडण्यासाठी १ जुलैला आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाखाली मुंबई महापालिकेवर विराट मोर्चा काढणार, अशी माहितीही उद्धव ठाकरेंनी दिली.उद्धव ठाकरे म्हणाले, मुंबईला मायबाप कुणी मायबाप राहिले नाही. रस्ता, पाणी, वीज सर्व कामांत प्रचंड भ्रष्टाचार केला जात आहे. आम्ही सत्तेत असताना तुटीतील मुंबई महापालिका आम्ही नफ्यात आणली. मात्र, मुंबईकरांचा पैसा बिल्डरांच्या घशात घातला जात आहे. लोकांची कामेसुद्धा होताना दिसत नाही. त्यामुळे लोकांच्या मनात प्रचंड खदखद आहे. याचा जाब विचारण्यासाठी १ जुलैला शिवसेना महापालिकेवर विराट मोर्चा काढणार. आदित्य ठाकरे या मोर्चाचे नेर्तृत्व करतील. जसा मविआचा मोर्चा झाला तशा मोर्चा काढण्यासाठी परवानगी देण्यात यावी, असे अरविंद सावंत यांनी म्हटले आहे. केवळ रुटवरुन चर्चा करण्यात आली आहे. ठाकरे गटाच्या नेत्यांनी पोलिस आयुक्तांची भेट घेतली असून, मोर्चाला परवानगी नाकारण्यात आली नाही, तर केवळ रुट संदर्भात आम्ही भेट घेतली असे त्यांनी स्पष्ट केले.



### भाषा शोभत नाही : मुख्यमंत्री

**दरोडा टाकणाऱ्यांच्या तोंडी चोरीचा भाषा शोभत नाही, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाच्या मुंबई महापालिकेवरील प्रस्तावित मोर्चावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना लगावला आहे. १५ ते २० वर्षे ज्यांनी मुंबई मनपावर दरोडा टाकला, त्यांच्या तोंडी चोरीची भाषा शोभत नाही. मुंबई मनपाचे हजारो कोटी कुठे गेले याचा हिशोब आता विचारणार आहे, असा इशारा मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना दिला आहे.**

# धुळे शहरासह परिसरात पावसाची हजेरी; बळीराजा सुखावला

**धुळे । प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले असताना महिनाभराच्या प्रतिक्षेनंतर धुळे शहरासह परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे शेतकरी सुखावला आहे. असे असले तरी दमदार पावसाची अजूनही प्रतिक्षा कायम आहे.

धुळे शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी यंदाच्या हंगामातील पावसाने हजेरी लावली आहे. जून महिना संपत आला तरी देखील अद्यापही पावसाने हजेरी लावली नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या होत्या. परंतु आज झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. यामुळे काही ठिकाणी शेतकरी पेरणीच्या तयारीला लागला आहे. पावसाने शहर व तालुक्यातील काही भागांत हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच तालुक्यातील अनेक ठिकाणी अद्यापही पावसाची प्रतिक्षा कायम आहे. तर आजच्या पावसामुळे शेतकऱ्यांना शेतात पेरण्या करण्यासाठी चाल मिळाली आहे. जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ वातावरण असून अजूनही सलग पावसाची प्रतिक्षा केली जात आहे. राज्यभरात मान्सुनचा पाऊस जोरदार बरसत असला तरी अद्यापही धुळे शहरासह जिल्ह्यात जोरदार पावसाची प्रतिक्षा होत आहे. धुळे जिल्ह्यात रविवार पासून सर्वत्र ढगाळ वातावरण तयार झाले असले तरी अद्यापही पावसाला सुरुवात झालेली नाही. काही ठिकाणी फक्त तुरळक स्वरुपात पाऊस झाला आहे. २५ जून अखेर जिल्ह्यात अवघ्या १४.८ मिलीमीटर पावसाची नोंद झालेली असून जून महिन्यात झालेला हा सर्वात कमी पाऊस आहे. पावसा अभावी जिल्ह्यातील पेरण्या खोळंबल्या आहेत. अनेक गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः शेतकरी वर्ग पावसाची प्रतिक्षा करीत होता, त्यातच मंगळवारी दुपारी १२ वाजेनंतर धुळे शहरात पावसाने दमदार हजेरी लावली. पाऊस सुरु झाल्याने लोकांची धावपळ उडाली मात्र अनेकांनी समाधानही व्यक्त केले.



### उकाड्यापासून दिलासा

**पाऊस येत नसल्याने नागरीक उकाड्याने हैरान झाले होते. मात्र दोन दिवस ढगाळ वातावरण होते. यात आज झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे.**

# आषाढी एकादशीला कुर्बानी नाही मुस्लीम बांधवांच्या निर्णयाचे स्वागत

**शिरपूर । प्रतिनिधी**

आगामी २९ जून रोजी हिंदू धर्मियांचा पवित्र आषाढी एकादशीचा सण व मुस्लीम धर्मियांचा बकरी ईद सण एकाच दिवशी आला आहे. या सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिरपूर पोलीस ठाण्याच्या आवारात शांतता कमिटीची बैठक झाली. त्यामध्ये आषाढी एकादशीला कुर्बानी न देण्याचा निर्णय मुस्लीम बांधवांनी घेतला. या कौतुकास्पद निर्णयाने राज्यात आदर्श ठेवला आहे. या निर्णयाचे हिंदू बांधवांनी देखील स्वागत केले आहे.

शिरपूर शहर पोलीस स्टेशनच्यावतीने शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस शिरपूर शहरातील दोन्ही धर्मियांचे प्रतिष्ठीत नागरिक, मौलाना, शहरातील नगरसेवक, सर्व पक्षाचे पदाधिकारी, व्यापारी व शांतता कमीटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिरपूर शहराचे प्रांताधिकारी प्रमोद भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे, तहसिलदार श्री.माळी, पोलीस निरिक्षक अन्साराम आगरकर, सीईओ.श्री. नेरकर यांनी वरीष्ठ कार्यालयाकडून प्राप्त सुचनांची माहिति दिली. तसेच दोन्ही धर्मियांनी आगामी सणांच्या दिवशी शांतता राखून उत्सव साजरे करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले.हिंदू बांधवांच्या भावना दुखावल्या जावू नये; म्हणून आषाढी एकादशीला कुर्बानी न देता दुसर्या दिवशी कुर्बानी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. मुस्लीम बांधवांच्या निर्णयामुळे शिरपूराची ओळख देशपातळीवर गेली आहे. आक्षेपार्ह पोस्ट फॉरवर्ड करू नका! सोशल मीडियावर कुणीही आक्षेपार्ह स्टेटस, डी.पी. तसेच व्हीडीओ, फोटो टाकू नये किंवा व्हायरल करू नये असे आवाहनही यावेळी पोलिसांकडून करण्यात आले. असे कोणी केल्यास त्याचेवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही उपविभागीय अधिकारी प्रमोद भामरे यांनी यावेळी दिला.

# ठाकरे गटाच्या शिवसैनिकांचा जनआक्रोश शिंगाडे मोर्चा

### शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी तहसीलवर धडक

**धुळे । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शिंदखेडा तहसील कार्यालयावर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिकांतर्फे शेतकरी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. शिवसैनिकांनी यावेळी प्रचंड घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

शेतकऱ्यांना अखंडित १८ तास वीजपुरवठा वीज वितरण विभागातर्फे देण्यात यावा. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या खराब झालेल्या ट्रान्सफॉर्मरची तात्काळ प्रशासनाने दखल घेऊन दुरुस्ती करून देण्यात यावी. तसेच शेतकऱ्याच्या मालाला योग्य तो हमीभाव मिळावा; या मागण्यांसह इतर मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा शिंदखेडा तहसील कार्यालयावर काढण्यात आला.

यात शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकर्यांनी हातात शिंगाडे उंचावून घोषणाबाजी करत सरकारच्या धोरणांचा निषेध केला. शिवसेनेचे धुळे जिल्हा संपर्कप्रमुख अशोक धात्रक, सहसंपर्कप्रमुख हिलाल माळी, जिल्हाप्रमुख हेमंत साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत दुपारी १२ वाजता गांधी चौक येथुन मोर्चाला सुरुवात झाली. यावेळी ढोलताशांच्या गजरात, भगवे झेंडे हातात घेत, जय भवानी, जय शिवाजी, शिवसेना जिंदाबाद, घोषणाबाजी करण्यात आली. पारधीवाडा, भगवा चौफुली मार्गे मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. मोर्चात मोठ्या संख्येने गर्दी असल्याने पोलीसांनी प्रवेशद्वारावरच मोर्चेकर्यांना अडवले. शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकार्यांच्या शिष्टमंडळाला तहसील समवेत चर्चा करण्यासाठी आत सोडण्यात आले. तहसीलदारांशी शेतकर्यांच्या मागण्यांवर चर्चा करुन मागणीचे निवेदन देण्यात आले. मागण्या सोडवल्या न गेल्यास आंदोलन तीव्र करत वेळप्रसंगी कायदा हातात घेण्यात येईल, असा गंभीर इशारा प्रशासनाला देण्यात आला. यावेळी पोलीस प्रशासनासह तहसीलदार, वीजपुरवठा अधिकारी, कृषि अधिकारी, मंडळ अधिकारी हजर होते यावेळी संपर्कप्रमुख अशोक धात्रक, सहसंपर्कप्रमुख हिलाल माळी, धुळे ग्रामीणचे जिल्हाप्रमुख हेमंत साळुंके, उपजिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे, भरत राजपुत, जिल्हा संघटक मंगेश पवार, जिल्हा समन्वयक डॉ. भरत राजपुत, युवासेना जिल्हायुवाधिकारी आकाश कोळी, उपजिल्हा संघटक कल्याण बागल, भाईदास पाटील, विधानसभा संघटक गणेश परदेशी, तालुकाप्रमुख गिरीश देसले, आदी उपस्थित होते.




# शौचालयाची दुरावस्था.. सांगा...आम्ही जायचं कुठं?

प्रश्न तसा छोटाच आहे मात्र सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. धुळे शहरात अद्याप एकही स्वच्छतागृह नाही. अर्थात नाही म्हणायला स्वच्छतागृहे आहेत मात्र तीच घाणीने माखली आहेत. धुळे शहरातील मालेगाव रोड दसरा मैदान जवळील मनपा सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाली आहे. सुलभ शौचालय गेले कित्येक महिने बंद आहे. आजूबाजूचा परिसर लोकसंख्येने गजबजलेला असताना लोकांना गैरसोयीचे होत आहे . नागरिकांची अडचण होत आहे. मनपाने येथे लक्ष द्यावे अशी मागणी देखील करण्यात येते आहे. प्रशासनाने सार्वजनिक शौचालयाच्या डागडुजीकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याने, या शौचालायाची अवस्था दयनीय झाली आहे. त्यामुळे नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे.

शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या ग्रामस्थांना विशेषत महिलांना लघुशंकेसाठी कुचंबणा सहन करावी लागते. त्यांना उघड्या, निर्जन ठिकाणांचा वापर करावा लागतो. यातून रोगराई होण्याचा धोकाही बळावतो. त्यामुळे मनपा प्रशासनाने मोक्याच्या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारून ग्रामिण भागातील लोकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. मात्र, जवळपास सर्वच शौचालयांत घाण आणि दुर्गंधी असल्याने त्याचा वापर फारसे कुणी करीत नाही. त्यातही काही शौचालय वगळता ईतर शौचालयांची बांधणी जिथे फारसे लोकं जात नाहीत त्या ठिकाणी केलेली आहे. त्यामुळे या शौचालयांचा कुठलाच उपयोग लोकांना होत नाही.

भाग २

स्वच्छतेचे प्रतीक म्हणून मनपाने अनेक स्वच्छतागृहे उभारली आहेत; परंतु या स्वच्छतागृहांची वेळेवर स्वच्छता होत नसल्याने स्पष्ट दिसून येते. त्यामुळे या सर्वजनिक स्वच्छतागृहाच्या इमारती शोभेच्या बाहुल्या असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. अनेक स्वच्छतागृहे अस्वच्छ आणि दुर्गंधीयुक्त आहेत. काही ठेकेदार पद्धतीवर चालवायला दिली असली तरी त्यांचीही अपेक्षित स्वच्छता होत नाही. मनपाच्या दुर्लक्षामुळे शहरातील स्वच्छतागृहाची ही दशा झाली आहे. याकडे मनपाने लक्ष घालून ती वेळेवर स्वच्छ करावीत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.







### स्वच्छतेचा पार बोजवारा

**काही सार्वजनिक शौचालयांच्या बाहेर सुशोभीकरण करण्यात आले आहे. परंतु आतमधील स्वच्छतेचा पार बोजवारा उडालेला असतो. महिलांना स्वच्छ आणि सुरक्षित शौचालयांची गरज आहे. कारण पुरुषांप्रमाणेच महिलाही दिवस-रात्र घराबाहेर काम करत असतात. सतत फिरतीवर असलेल्या महिलांना तर किती त्रास होत असेल? याचा देखील विचार मनपा प्रशासनाने केला पाहिजे.**



शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

# चार जणांचा तिघांवर प्राणघातक हल्ला; गुन्हा दाखल

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत चालली असून पोलिसांसमोर गुन्हेगारी रोखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशातच आता पुन्हा एकदा शहरातील म्हसरूळ पोलीस ठाणे हद्दीत मागील भांडणाची कुरापत काढून चार जणांनी तिघांवर प्राणघातक हल्ला करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सौरभ विठ्ठल कदम (वय २०, रा. राजलक्ष्मी अपार्टमेंट, आदर्शनगर, पेठ रोड, नाशिक) यांनी म्हसरूळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्या तक्रारीत म्हटले आहे की, सोनू धात्रक, सागर येलमामे, रोहित पगारे, पप्पू रणमाळे (पत्ता माहित नाही) यांनी म्हसरूळ पोलीस ठाणे हद्दीतील चाणक्य हाऊसिंग सोसायटी समोरील कृष्णा सोसायटी मखमलाबाद म्हसरूळ लिंक रोडवर संगनमत करून जुन्या भांडणाची कुरापत काढत सौरभ कदमसह दोघांना हत्याराने तसेच लाकडी दांडक्याने हल्ला करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर म्हसरूळ पोलिसांनी सौरभ कदम याच्या फिर्यादीवरून वरील चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## ऐक्य की मृगजळ?

यातील पुढाकाराची जबाबदारी नितीशकुमार निभावत आहेत. पण, काँग्रेसच्या नेतृत्वाखाली पुढे जाण्याची इतरांची तयारी आहे का? हा खरा प्रश्न. महाआघाडी करू, मात्र काँग्रेसने नेतृत्व करू नये, असा राज्यस्तरावर प्रबळ असणार्या पक्षांमधील विचारप्रवाह दिसतो.

पाटण्यात झालेल्या बैठकीत १७ विरोधी पक्षांनी भाजपविरुद्ध एकत्र लढण्याची भूमिका घेतली. पुढील महिन्यात विरोधी पक्षनेते सिमल्यात भेटणार आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी विरोधकांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे. निवडणुकीच्या दृष्टीने किमान समान कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्याचे सूतोवाच झाले. मात्र, जागावाटप हाच कळीचा मुद्दा ठरणार असून, सिमल्यातील आगामी बैठकीनंतर विरोधकांच्या ऐक्याबद्दल अधिक स्पष्टता येऊ शकेल. विरोधी पक्षांमधील बर्याच नेत्यांना आता ऐक्याची गरज जाणवत आहे. त्यांचा बदललेला सूर पाटण्यातील बैठकीत दिसला. आम आदमी पक्षाला केंद्राच्या वटहुकमाविरोधात काँग्रेससह सर्व विरोधकांचा पाठिंबा हवा आहे. आतापर्यंत तो पक्ष 'एकला चलो रे' या भूमिकेत होता. पाटण्यातील बैठकीत दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संस्थापक अरविंद केजरीवाल सहभागी झाले, हा लक्षणीय बदल. अधिकारी आणि कर्मचार्यांच्या बदल्यांचे अधिकार वटहुकमाद्वारे नायब राज्यपालांकडे राहणार असल्याने आणि आपल्या सहकार्यांवरील केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईमुळे केजरीवाल संतप्त आहेत. वटहुकमाबद्दल काँग्रेसने भूमिका स्पष्ट करावी, हा त्यांचा आग्रह असला, तरी अद्याप तो मानला गेलेला नाही. उलट, आमच्यावर दबाव आणू नका, हे काँग्रेसने बजावले. स्थानिक पातळीवर मार्क्सवाद्यांशी सहकार्य कराल, तर लोकसभेसाठी आमच्या मदतीची अपेक्षा करू नका, हे ममता बॅनर्जींनी काँग्रेसला बजावून फार दिवस झालेले नाहीत. तृणमूल काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि काही प्रादेशिक पक्षांमध्ये असलेली काँग्रेसविरोधी भावना कमी झालेली दिसत नाही. तो घटक विरोधकांच्या ऐक्यामध्ये कायम अडथळा ठरत आहे.

नेतृत्व कोणाकडे?

विरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेणे वेगळे आणि विरोधकांमध्ये ज्या पक्षाची ताकद मोठी आहे त्या पक्षाचे स्थान मान्य करून पुढे जाणे वेगळे! यातील पुढाकाराची जबाबदारी नितीशकुमार निभावत आहेत. पण, काँग्रेसच्या नेतृत्वाखाली पुढे जाण्याची इतरांची तयारी आहे का? महाआघाडी करू, मात्र काँग्रेसने नेतृत्व करू नये, असा राज्यस्तरावर प्रबळ असणार्या पक्षांमधील विचारप्रवाह दिसतो. तेलंगणचे मुख्य मंत्री के.चंद्रशेखर राव यांची 'भारत राष्ट्र समिती' महाराष्ट्रातही आक्रमक विस्तार करण्यासाठी पावले उचलत आहे. तेलंगणात भारत राष्ट्र समिती विरूद्ध काँग्रेस, अशीच मुख्य लढत होईल. लोकसभेसाठी त्यांनी तिसरी आघाडी स्थापन केल्यास विरोधी मतांमधील फूट टाळणे अवघड जाणार आहे. समाजवादी पक्षाची काँग्रेससंदर्भातील भूमिका अनुकूल म्हणता येईल अशी नाही. नव्या संसद भवनाच्या उद्घाटनावर बहिष्कार घालण्याच्या विरोधकांच्या निर्णयात जेडीएस, वायएसआर काँग्रेस, तेलगु देसम, बहुजन समाज पक्ष यांचा सहभाग नव्हता, हेही लक्षात घ्यावे लागेल. कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयामुळे काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला, अन्य विरोधी पक्षांच्या आशा पल्लवित झाल्या. त्याचवेळी, संभाव्य आघाडीत काँग्रेसचे वर्चस्व वाढणार या शक्यतेने बिगर भाजप पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली हे देखील नाकारून चालणार नाही. 'आम्ही तडजोड करण्यास तयार आहोत', असे काँग्रेसने स्पष्ट केले आहे. नितीशकुमार यांनी आपण पंतप्रधानपदाच्या शर्यतीत नाही, त्या पदासाठी इच्छुकही नाही, असे म्हटले आहे. अशावेळी ऐक्याचा सुकाणू त्यांच्याच हाती ठेवून संभाव्य महाआघाडीत वरचष्मा राखण्याचा पर्याय काँग्रेससमोर राहील. दुसरा पर्याय, वाटाघाटींची सूत्रे काँग्रेसने स्वतः हाती घेणे. सिमल्यातील बैठक काँग्रेसच्या अध्यक्षतेखाली होत आहे. चाचपणीसाठी काँग्रेसला ती संधी ठरेल. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला टक्कर देण्यासाठी एकास एक उमेदवार उभा करणे, याला प्राधान्य राहील, असे विरोधकांकडून सांगितले जात आहे. मध्य प्रदेश, राजस्तान, छत्तीसगढ या राज्यांतील आगामी विधानसभा निवडणुकांचा कौल भाजप आणि विरोधक या दोघांसाठीही महत्त्वाचा ठरणार आहे. महाआघाडीच्या दृष्टीने तो निर्णायक राहू शकेल. तोपर्यंत संभाव्य आघाडीला औपचारिक स्वरूप येणे कठीण वाटते.

# समानतेसाठी समान नागरी कायदा

**प्रत्येक समाजातील कायद्यात काळानुसार संस्करण हवे, तशी मानसिकता बनवणे हे राजकीय नेतृत्वाचे काम आहे. देशभर समान नागरी कायद्याची अंमलबजावणी हा याच संस्करणाचा भाग आहे. आपल्या देशात विविध धर्मियांच्या वैयक्तिक कायद्यांमध्ये भेद आहेत; ते दूर व्हायला हवेत. समान नागरी कायद्यात हे सर्व विषय समानतेने हाताळले जाणार आहेत. त्याच्या अंमलबजावणीमध्ये अधिक विलंब न करणेच उत्तम.**



गेले काही दिवस या देशामध्ये विविध पातळ्यांवर समान नागरी कायद्याविषयी चर्चा सुरू झाली आहे. याला कारणीभूत ठरली ती लॉ कमिशनची घोषणा. त्याद्वारे त्यांनी सर्वसामान्य नागरिकांकडून या प्रस्तावित कायद्यासाठी सूचना मागवल्या. याचाच अर्थ पुढच्या काही महिन्यांमध्ये हा कायदा अस्तित्वात येणार, याबद्दल सरकार आश्वस्त आहे. ही राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची आहे. याचे कारण स्वातंत्र्योत्तर काळात ज्या कायद्याविषयी सर्वाधिक गदारोळ, गोंधळ आणि मतमतांत्तरे व्यक्त झाली तो म्हणजे समान नागरी कायदा. तो अस्तित्वात येण्यासाठी कणखर राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. आपल्या संविधानात न्याय आणि समानता ही तत्त्वे आहेत, तर वैविध्य जपण्याविषयी जागरूकता आहे. या देशात अनेक धर्म, पंथ, जाती, चालीरिती, श्रद्धा आणि कायदे आहेत. विशेष म्हणजे हा केवळ धार्मिक, सामाजिक विषय नसून गेल्या काही वर्षांमध्ये तो राजकीय बनला आहे. हा कायदा संमत होण्यावर लोकसभा २०२४ चे मतदान अवलंबून असणार आहे, असे मानले जाते. म्हणून त्याची चर्चा आवश्यक आहे. समान नागरी कायदा म्हणजे काय? ढोबळ मानाने बोलायचे झाले तर विवाह, विवाह विच्छेद, दत्तक, वारसा अशा अनेक बाबतीत सध्या धर्माधर्मांमध्ये असलेली भिन्नत्ता दूर करून सर्व समाजाला एका कायद्याच्या पातळीवर आणणे. प्रत्येक धर्माचे हे कायदे आधी समजून घेतले पाहिजेत. प्रत्येक धर्मामध्ये श्रद्धा, रूढी, परंपरा आहेत. त्याच्या संरक्षणासाठी पर्सनल लॉ आहेत. उदाहरणार्थ हिंदू पर्सनल लॉ. याचा आधार या देशातील वेद, उपनिषद उदार अशी प्राचीन संस्कृती आणि आधुनिक काळातील समानता आणि न्यायाच्या संकल्पना यावर आधारित आहे. मुस्लीम पर्सनल लॉमध्ये कुराण, खियास, शुन्ना, इजिवाह यांचा आधार घेतला आहे. शतकानुशतके बदल न केलेल्या रूढी-परंपरांचा पाया या पर्सनल लॉला लाभला आहे, तर ख्रिश्चन पर्सनल लॉ बायबलमधील परंपरांनुसार आखण्यात आला आहे. या व्यतिरिक्त अनेक धर्मांचे पर्सनल लॉ आहेत. समान नागरी कायदा सर्वच धर्मांमधील त्रुटी दूर करून एका पातळीवर आणणार आहे. उदा. मुस्लीम पर्सनल लॉमध्ये मुलगी वयात आल्यावर लग्नायोग्य समजली जाते. ही तरतूद बालविवाह विरोधी कायद्याच्या विसंगत आहे. ख्रिश्चन पर्सनल लॉमध्ये ख्रिश्चन महिला जन्म दिलेल्या मुलांची नैसर्गिक पालक नसते. शीख पर्सनल लॉमध्ये विवाह विच्छेदाची तरतूद नाही. त्यामुळे हिंदू विवाह कायद्यानुसार त्याचे खटले चालवले जातात. दत्तक विधानाच्या बाबतीत पारशी समाजात मुलींना दत्तक घ्यायला मान्यता नाही, तर हिंदू समाजात वारस स्त्री अथवा पुरुष यात भेद आहेत. मेघालयातील काही जमातींमध्ये मातृसत्ताक पद्धत आहे, तर त्याच्या बाजूला असलेल्या नागालँडमध्ये महिलांना वारसा हक्क नाही. इतकी विषमता असताना भारतीय जनता पक्ष समान नागरी कायद्याचा अजेंडा का बरं पुढे रेटतोय.


भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात कलम ३७० रद्द करणे, राम मंदिर उभारणे आणि समान नागरी कायदा या मुद्द्यांचा उल्लेख आहे आणि तसा तो जनसंघ काळापासून आहे. नेमके आता लॉ कमिशनने हे पुढे का रेटले असावे? एक तर नेहरू काळापासून मुसलमानांचे लांगूलचालन आणि भीती यावर बऱ्याच गोष्टींचे नियोजन व्हायचे. पण कलम ३७० आणि ट्रिपल तलाक स्वीकारले गेले. हा समााजिक बदल महत्त्वाचा आहे. राज्य संविधानानुसार धर्मनिरपेक्ष असेल तर विविध धर्मांचे वेगवेगळे कायदे असण्याचे समर्थन कसे करणार? त्यामुळे 'एनी टाईम इज राईट टाईम' हे सूत्र अवलंबणे सोपे होईल. काहीजण त्यासाठी तयार असतील, काहीजण विरोध करतील, काहीजण अनभिज्ञ असतील, तर काहींच्या विरोधाला राजकीय आणि धार्मिक स्वार्थाची किनार असेल हे अपेक्षितच आहे. या सगळ्या प्रक्रियेत पारदर्शकता असणे महत्त्वाचे आहे. घटनेच्या कलम ४४ नुसार राज्याने आपल्या नागरिकांसाठी देशभर समान नागरी कायदा लागू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी तरतूद केली आहे. यावर १९९५ मध्ये झालेल्या सरला मुदगल खटल्यात सविस्तर चर्चादेखील झाली आहे. विरोधी पक्ष आणि एमआयएम यांनी मात्र कडाडून विरोध करताना या कायद्याची संकल्पना आणि हेतू यावर आक्षेप नोंदवला आहे. पंतप्रधान मोदी यांनी नव्या संसदेचे उद्घाटन केले म्हणून याच मंडळींनी समारंभावर बहिष्कार टाकला होता.

वर्षानुवर्षे एका समाजाच्या लांगुलचालनासाठी काही नितीनियमांकडे दुर्लक्ष केले गेले असल्यास दुरुस्त करणे गरजेचे आहे. पण त्यामुळे इथे नांदणारे विविधेतील वैशिष्ट्य नष्ट होईल, अशी भीती काहीजणांना वाटते, तर काहींना यात हिंदू राष्ट्र अजेंडा दिसतो. संविधानामध्ये समान नागरी कायद्याचा उल्लेख डायरेटिव्ह प्रिन्सिपल्समध्ये आहे. त्याची कायदेशीर अंमलबजावणी बंधनकारक नाही. सुप्रीम कोर्टात या विषयावर आतापर्यंत पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर तीन खटल्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली आहे. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने समान नागरी कायदा अस्तित्वात आला पाहिजे, त्याने समाजाचा फायदाच होईल, असे निरीक्षण नोंदवले आहे. याची दखल घेणे महत्त्वाचे. खरे तर या देशातील अनेक कायद्यांमध्ये बदल अथवा दुरुस्ती करायला हवी. काही रद्द व्हायला हवेत. पण मग याच कायद्याला इतके प्राधान्य का? या देशात समान करपद्धती नाही. मग समान कायद्याचे समर्थन कसे करणार, विविधता कशी जपणार याविषयी साशंका आहे. हिंदू अनडिव्हायडेड फॅमिलीमधल्या तरतुदी इतर धर्मियांवर लादल्या जाणार का? अशी भीती अल्पसंख्याकांच्या मनात आहे. खरे तर कायद्याचा मसुदा समोर येईल तेव्हा त्यावर भाष्य करणे योग्य ठरेल. असा मसुदा चर्चिला जाईल, लॉ कमिशनकडून संसदेच्या स्टँडिंग कमिटीकडे आणि पुढे लोकसभेत चर्चेला येईल. त्यावर साधक-बाधक चर्चा अपेक्षित आहे. तेव्हा संविधानाने प्रधान केलेली धर्माचरणाची मुभा हा मुद्दा चर्चेला येईलच. संविधानातील कलम २५ धार्मिक श्रद्धानुसार धर्माचरणाचा अधिकार देते आणि कलम २९ अन्वये आपले वैशिष्ट्य आणि संस्कृती जपणुकीचा अधिकार प्रदान करते. आजवर भारतीय संविधानामध्ये शंभरहून अधिक वेळा बदल केले गेले आहेत. हाच तर संविधान जिवंत असल्याचा पुरावा आहे. आणखी एक गैरसमज म्हणजे हिंदू पोटबिलाअंतर्गत हिंदू हे राष्ट्र आहे. हे वस्तुस्थितीला धरून नाही. याविषयी धुरळा जास्त आणि सत्यता कमी अशी परिस्थिती आहे. एखाद्या धर्मातील चांगली गोष्ट दुसऱ्या धर्मात का स्वीकारली जाऊ नये? उदा. मुसलमानांमध्ये दत्तक विधान असणे, ख्रिश्चन महिलांना त्यांचे वारसा हक्काचे अधिकार मिळणे, मुस्लीम महिलांना घरच्या प्रॉपर्टीमध्ये अधिकार मिळणे अशा अनेक बाबी दखलपात्र आहेत; परंतु हे सर्व राजकारणविरहीत संवादाने शक्य आहे. ट्रिपल तलाकविषयी या सरकारने घेतलेल्या भूमिकेचे स्वागत सुप्रीम कोर्टानेही केले. मग एखाद्या समाजात मध्ययुगीन बुरसटलेल्या रूढी-परंपरा असतील तर त्यांना मुठमाती द्यायला नको का? मुळात समान नागरी कायद्याला केवळ मुसलमानांच्या झरोक्यातून बघणे योग्य आहे का? 'मुस्लीम मॅरेज क्ट'मधील अल्पवयीन विवाह इतर समाजाने घ्यायचा का? भारतीय संविधानात असलेला पॉक्सो कायदा तिकडे लावायचा या सगळ्यांकडे धर्मानुनयी या भूमिकेतून न बघता प्रथम नागरिक या भूमिकेतूनच पाहिले पाहिजे.

प्रत्येक समाजातील कायद्यात काळानुसार संस्करण हवे, तशी मानसिकता बनवणे हे राजकीय नेतृत्वाचे काम आहे. आजचा समान नागरी कायद्याचा विरोध हे तद्दन राजकीय स्वार्थाचे लक्षण आहे. काही राज्यांनी पुढाकार घेऊन आपल्यापुरत्या समान नागरी कायद्याचा मसुदा आणि अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समित्या नेमल्या; परंतु त्याच्या वैधतेबद्दल केव्हाही शंका घेतल्या गेल्या. या कायद्याची अंमलबजावणी देशभर होणे महत्त्वाचे आहे. देशात गुन्हेगारी कायदे सर्वांना लागू आहेत. वैयक्तिक कायद्यात भेद आहेत; ते दूर व्हायला हवेत. समान नागरी कायद्यात हे सर्व विषय समानतेने हाताळले जाणार आहेत. त्यामुळे त्यात अधिक विलंब न करणेच उत्तम. हा वैयक्तिक आयुष्यातला हस्तक्षेप नाही, तर सुधारणा आहे. यात महिलांना पुरुषांइतके अधिकार मिळणे अपेक्षित आहे. उदा. इस्लाममध्ये घटस्फोटाची तरतूद एकतर्फी आहे. स्त्रियांना त्यासाठी काझीवर अवलंबून राहावे लागते. पुरुषांना मात्र मोकळीक आहे. मुसलमानांमध्ये दत्तक पद्धत नाही या तत्त्वामध्ये सुधारणा झाल्या तर बहुतांश मुस्लीम समाज दुवाच देईल. मूठभर काझी, मुल्ला आणि मौलवी बददुवा देतील. याचसाठी आंबेडकर शरीयाच्या विरोधात आणि समान नागरी कायद्याच्या बाजूने होते. समान नागरी कायदा अस्तित्वात येणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वप्नपूर्ती आहे एवढे मात्र निश्चित.

**- डॉ. उदय निरगुडकर, ज्येष्ठ अभ्यासक**

## शब्दकोडे-१०५



आडवे शब्द

१. अरण्य ३. बोलविणे ६. एक श्वासरोग ८. हार ११. संगीतसम्राट १२. शाळेतील शिक्षक १४. अंत:करण १५. नम्र, वाकलेला १७. आवळ्याची चव १०. दार २१. झोप, निंद्रा २२. अवस्था २४. पृथ्वी २६. तिन्ही लोकात फिरणारा मुनी २८. विपुलता, रेलचेल २९. गणपती ३१अ. हिंदीत प्रार्थना ३३. म्हणीतील त्रिदल ३४. चेष्टा करणारा ३५. अधिक महिना ३७. पर्ण ३८. दाट, ढग ३९. रडून गोंधळ ४०. दर्पण ४२. वर्ष, सण ४३. म झे ४४. दोषच्या विरुद्ध ४५. प्राज्ञा, हिंमत ४६. जुळे ४८. वाड्यातील मधली खोली ५०. अंदाज, तर्क ५२. मनातील काळेबेरे ५३. त्रास ५५. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री ५७. ओरखडा ५८. व्यवसाय, व्यापार ५९. खोडकरम द्वाड (हिंदी) ६०. मज्जाव ६१. धन्यवादाचा शब्द ६३. सैन्याचा दाणागोटा ६५. संतोष, तृप्ती ६७. भार, बोजा ६९. नाश पावणे ७१. धनी, स्वामी ७३. ढग (संस्कृत) ७५. बांगड्याचा व्यवसाय करणारा ७७. चामखीळ ७९. कुत्र्याला केलेली आज्ञा ८०. जाणणे, परिचित असणे ८१. तृण ८२. मजबूत ८. नरक, यमपुरी ८४. भांडण

उभे शब्द

१. वन्य, रानटी २. वेल ३. दक्षिणेच्या समुद्रापासून ते उत्तरेच्या हिमालयापर्यंत ४. काळ्या तोंडाचे माकड ५. धुंदी, कैफ ६. थांबून थांबून ७. शिक्षक ९. कौसल्यापुत्र १०. जन्मदात्री १३. पाठविलेला १६. पर्वत १८. चेष्टा, टिंगल २०. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र २३. तमाशात काम करणारा २५. लाकडाची एक उत्कृष्ट जात २७. मालमत्ता ३०. कानाखाली काढण्याची आग! ३१. नमस्कार, वंदन ३२. अधिकार नसताना हुकूम गाजवणारा ३४. पत्र ३६. एकटा ३८. सुगंधाची दरवळ ४०. आपला परका अशी भावना ४१. मलई ४२. सोज्वळ, प्रामाणिक ४३. मला ४५. धातूवरील देव प्रतिमा ४७. निवडणुकीपुरता आठवणारा ४९. चेहऱ्यावरील तेज ५१. मागणे ५४. गरीबांवर दया करणारा ५६. चालू काळ ६०. मनातील इच्छा दाबणे ६२. चंद्र ६४. मनातील टोचणारे दु:ख ६६. शहाण, हुशार (हिंदी) ६८. पुरुष ७०. खूप, पुष्कळ ७२. पाण्यावरील तेलाचा थर ७४. ओलसर हवा ७६. मधुमेहींसाठी ही कडूच! ७८. उत्सव ८०. रांग

### शब्दकोडे १०४ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.१.फयान ४.पदरमोड ८.नवरा १०.चमत्कार ११.हातचलाखी १३.रक्षक १४.वासना १५.रामा १६.वारा १७.रान १८.काया २०.गो २१.तरुणी २२.टीकाकार २५.रतन २७.मळमळ २८.जस्त ३०.नामदार ३२.जळवात ३४.मनन ३६.वाचा ३८.पाया ३९.फारकत ४०.रत ४२.कपाळ ४३.जननमरण ४५.मस्त ४७.नगर ४८.तप ५०.तग ५१.स्तवनीय ५३.आळ ५४.तबक ५६.कथानक ५८.नायनाट ५९.सरकार ६२.उपकार ६३.बलक ६५.विळी ६६.परात ६७.दमदाटी ६९.बटन ७०.आभार ७२.तडकसार ७३अ. जग ७४.वसाहत ७४अ.फरीदा ७५.कणीदार

**उभे उत्तर**

१.१.सनसनाटी २.याचक ३.नम ४.परवानगी ५.रचनाकार ६.डहाळी ७.कचरा ८.नखी ९.राजाराणी ९अ.घरघंटी १२.लामा १६.वारुळ १९.यातना २१.तमस २३.काजळ २४.रजत २६.नमस्कार २७.मरवा २९.जनक ३१.छाया ३२.जळजळ ३३.वाहनतळ ३४.मरणयातना ३५.नतमस्तक ३७.चाकरचुकर ३८.पाळत ३९.फार ४१.तनय ४४.मग ४६.स्तव ४९.पदक ५२.नीरस ५३.आपपरभाव ५५.बटबटीत ५७.नजरानजर ५८.नारद ६०.रविवार ६१.काळी ६४.कथेकरी ६६.पट ६८.मदत ६९.बरणी ७१.रसा ७२अ.डफ ७३.सादा

## जगाचा पोशिंदा पावसाच्या प्रतीक्षेत



मागील दहा वर्षांचा राज्यातील शेतकऱ्यांचा शेतीविषयक अभ्यास केल्यास त्याचप्रमाणे आपल्या राज्यातील शेतकरी राजाची आर्थिक परिस्थिती कशी आहे, याचा विचार करता शेतीला योग्य बी-बियाणे, रासायनिक खते. त्याचप्रमाणे गावागावात कृषी विभागाचे योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे. तेसुद्धा केवळ शासन आपल्या दारी, शासन आपल्या शेताच्या बांधावर इतके म्हणून शासनाने थांबू नये, तर शासन शेतकऱ्याने नांगरलेल्या कोपऱ्यात जाऊन प्रत्यक्षात शेतकरी राजाला नांगरणी व लावणीचे प्रात्यक्षिक दाखविले पाहिजे. कारण बऱ्याच वेळा पावसाळ्यात कृषी विभागाची तज्ज्ञ मंडळी येते आणि ग्रामपंचायतीमध्ये कशा प्रकारे शेतीची लागवड करायची याची माहिती देतात.

यात गावातील खरा शेतकरी अशा माहितीसाठी ग्रामपंचायतीमध्ये जातच नाही. त्यांना एकच माहीत की, असे जाऊन आपला काय फायदा होणार. शेवटी संकट आले की, आपल्यालाच तोंड द्यावे लागते. शेती, तर काय पावसावर अवलंबून असते. तेव्हा प्रत्येक गावातील अशा शेतकऱ्यांना एकत्र करून शासनाने आपल्या स्तरावर सामूहिक शेती करावी. त्याला योग्य कर्ज द्यावे. पीकविमा द्यावा, उत्पादित झालेले उत्पन्न स्वत: खरेदी करावे. जे गटात समाविष्ट केलेले असतील, त्यांना समप्रमाणात हिस्सा द्यावा. म्हणजे त्यांना तेवढा आर्थिक फायदा होऊन त्यांचे जीवनमान उंचावू शकते. यासाठी शासनाने शेतकऱ्यांसाठी अशा प्रकारे पुढाकार घेणे आवश्यक आहे.

बऱ्याच प्रमाणात नैसर्गिक आपत्ती येऊन मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होते. सध्या तर माकडदादा रोज सकाळ-संध्याकाळ शेताच्या बांधावर दिसतात. त्यामुळे शेतीची राखण करावी लागते. काही वेळा शेतकऱ्याची नजर चुकवून शेतीचे नुकसान करतात तसेच मोकाट सुटलेली गुरेसुद्धा शेतीची नासधूस करतात, यामुळे शेती करूच नये, असे शेतकऱ्यांना वाटते. जून महिना संपत आला तरी शेतकरी राजा पावसाच्या प्रतीक्षेत आहे. तेव्हा जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी राजाला आर्थिक आधार देणे हे राज्य सरकारचे आद्यकर्तव्य आहे.

**-समाप्त:**

**-रवींद्र तांबे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# प्रभाग क्रमांक ७ मध्ये मोफत नेत्र चिकित्सा, शिबीरात चष्मे वाटप

नाशिक । प्रतिनिधी



शिवसेना वर्धापनदिन सुरु असलेल्या 'भगव्या महिन्या' अंतर्गत प्रभाग क्रमांक ७ चे माजी नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्या माध्यमातून ऊर्जा युवा प्रतिष्ठान व निलवसंत मेडिकल फाउंडेशन रिसर्च सेंटर नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र चिकित्सा व चष्मे वाटप शिबीराचे आयोजन नवीन तांबट लेन, कंसरा मंगल कार्यालय, अशोक स्तंभ येथे करण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पालकमंत्री दादाजी भुसे, निलवसंत मेडिकल फाउंडेशन रिसर्च सेंटरच्या अध्यक्षा डॉ. प्राची पवार, कंसरा महिला मंडळाच्या अध्यक्षा उज्वला तांबट, कल्पना तांबट, सुनिता तांबट, करुणा तांबट, कंसरा युवक मंडळाचे प्रसन्ना तांबट, सागर तांबट, रोहित तांबट, गणेश तांबट, जिवन तांबट, अमोल तांबट, उप जिल्हाप्रमुख शशिकांत कोठूळे, महेश जोशी, मध्य विधानसभा प्रमुख रोशन शिंदे, उप महानगर प्रमुख आनंद फरताळे यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कंसरा मंगल कार्यालयात लावण्यात आलेल्या तांबट लेन मधील तांब्याची भांडी घडवण्याच्या कारखान्यांची चित्र संग्रहाची पाहणी करून पालकमंत्री दादाजी भुसे यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांसाठी विविध सुविधा दिल्या असल्याची माहिती देत येत्या काळात महिलांसाठी सरकारतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती ना. भुसे यांनी दिली.

प्रभाग क्रमांक ७ चे नगरसेवक व ऊर्जा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय बोरस्ते यांनी आपला जीवनप्रवास याच तांबट आळीतून सुरु झाल्याचे सांगितले. शेजारीच असलेली त्यांचे वडील कै. भास्करराव बोरस्ते यांची प्रिंटींग प्रेस असल्याचे सांगितले. गत काळातील तांबट लेन मधील तांब्याची भांडी घडविणाऱ्या कारखान्यांची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. सध्याच्या काळात हे पारंपारिक व्यवसाय लुप्त होत चालले असून तो वारसा आपण जपला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

मोफत नेत्र चिकित्सा शिबीर तर अनेक लोक, संस्था भरवत असतात, परंतु मोफत चष्मे वाटपाचे आयोजन कोणी करत नाही. आज उर्जा युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत असलेल्या नेत्र चिकित्सा व मोफत चष्मे वाटपाचे आयोजन केल्याबद्दल निलवसंत मेडिकल फाउंडेशन रिसर्च सेंटरच्या अध्यक्षा डॉ. प्राची पवार यांनी समाधान व्यक्त केले. या मोफत नेत्र चिकित्सा शिबीर व चष्मे वाटप शिबिराला अशोक स्तंभ परिसरातील ३०० हून अधिक महिलांनी आपले डोळे तपासून घेतले. तर २०० हून अधिक महिलांना डोळ्यांचे चष्मे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रसन्ना तांबट यांनी तर कंसरा महिला मंडळ व युवक मित्र मंडळाने विशेष सहकार्य केले.

## लोकज्योती मंचच्या वर्धापनदिनी गुरुवारी तीन संघांना कार्यक्षम संघ पुरस्कार देणार

**नाशिक ।** गेल्या १७ वर्षांपासून ज्येष्ठांसाठी विधायक कार्य करीत असलेल्या लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचचा वर्धापनदिन सोहळा गुरुवार दि.२९ जून रोजी दुपारी ४ वाजता परशुराम सायखेडकर नाट्यगृह, नेहरू गार्डन जवळ, शालीमार येथे संपन्न होत आहे . अशी माहिती मंचचे अध्यक्ष रंजनभाई शाह, रमेश डहाळे, जितेंद्र येवले, देवराम सैंदाणे, भा.रा.सुर्यवंशी, वैशाली पिंगळे, कुमुदिनी कुलकर्णी यांनी दिली. वर्धापनदिन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून सुशिल आय केअर संचलित डॉ. अग्रवाल्स् आय हॉस्पीटलचे प्रसिध्द नेत्रविकार तज्ञ डॉ. शरद पाटील तसेच माजी सभागृह नेते दिनकर पाटील प्रमुख अतिथी उपस्थित राहणार आहेत.नाशिकसह जिल्ह्यातील ३ ज्येष्ठ नागरिक संघांना 'कार्यक्षम ज्येष्ठ नागरिक संघ' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी मिनाक्षी मेतकर यांचे ओम भजनी मंडळ तसेच उज्वला वाणी यांचे राधाकृष्ण भजनी मंडळ यांच्या सदाबहार भजनांचा कार्यक्रमही यावेळी ठेवण्यात आला आहे. या वर्धापनदिन सोहळ्यासाठी नाशिकसह जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बाळकृष्ण दंडगांवकर, डी.एम.कुलकर्णी, कमला पणेर, प्रकाश महाजन, बापू अमृतकार, सविता चतूर, हरिश्चंद्र निंबाळकर, वसंतराव पुंड यांनी केले आहे.

## एसबीसी आरक्षण प्रकरणी शासन योग्य बाजू मांडून संरक्षण देणार

### आ. देवयानी फरांदे यांनी घेतली मुख्यमंत्री शिंदे यांची भेट

मुंबई । प्रतिनिधी



विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षण प्रकरणी न्यायालयात दाखल जनहित याचिकेत शासनाकडून आरक्षण टिकवण्यासाठी योग्य बाजू मांडण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल. महाधिवक्ता यांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच एसबीसीचे सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण संबंधी जुने समितीचे अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. एसबीसी आरक्षणास संरक्षण शासन देण्यासाठी सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. अशी माहिती नाशिकच्या आ. देवयानी फरांदे यांनी दिली.

मानीव दिनांकापूर्वीचे पुरावे सादर करु न शकणाऱ्यांसाठी पुरावे का सादर करु शकत नाही. याबाबतचे स्पष्टीकरण प्रतिज्ञापत्रात सादर करावा. यावर गृहचौकशी करून जात वैधता प्रमाणपत्र देण्याची तरतूद कायद्यात आहे. त्यानुसार प्रमाणपत्रे मिळण्यास अडचणी येतात. त्यामुळे खरे लाभार्थी वंचित राहतात ही बाब अशोक इंदापुरे यांनी सांगितले. यावर मुख्यमंत्री यांनी प्रतिज्ञापत्र विचारात घेऊन जात वैधता प्रमाणपत्र सुलभतेने देण्यासाठी संबंधित समिती अधिकाऱ्यांना सूचना देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रवेश प्रक्रियेत संबंधित उमेदवारांचे जातीनुसार मूळ प्रवर्ग याबाबतचा तपशील सॉफ्टवेअरमध्ये अंतर्भूत करण्याची सूचना दिली. विणकर समाजासाठी आर्थिक महामंडळ स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करणार. हातमाग विणकर यांना सामाजिक सुरक्षा व निवृत्तीवेतन आरोग्य सुविधा देण्याबाबतचे धोरण जाहीर करणार आहेत.

## गुळवंच प्रकल्पातील पिडितांच्या प्लॉटवर सुविधांसाठी शासनाकडे ८० कोटींचा प्रस्ताव

### खा.हेमंत गोडसे यांची माहिती

नाशिक । प्रतिनिधी

इंडिया बुल्स प्रशासनाने पिडित शेतकऱ्यांच्या प्लॉटवर कोणत्याही प्रकारच्या सोयी - सुविधा न केल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून खा.हेमंत गोडसे प्रयत्नशील आहेत. खा. गोडसे यांच्या प्रयत्नांना आता यश आले आहे. उद्योग विभागाच्या जिल्हा प्रशासनाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी ८० कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला आहे. येत्या काही महिन्यात या प्रस्तावास मान्यता मिळणार असून उपलब्ध असलेल्या प्लॉटवर लवकरात वीज, पाणी, गटार आदी मूलभूत सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती खा.गोडसे यांनी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षांपूर्वी तात्कालीन सरकारने इंडिया बुल्ससाठी सिन्नर तालुक्यातील गुळवंच येथील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित केलेल्या आहेत. पैकी काही जमिनींवर उद्योग उभारले असून काही जमिनी मात्र पडून आहेत. याबरोबरच पीडितांसाठी १८० हेक्टर जमिनीवर दोनशे प्लॉट तयार करण्यात आलेले आहे. परंतु ठरवल्याप्रमाणे इंडिया बुल्स प्रशासनाने सदर प्लॉटवर कोणत्याही सोयी -सुविधांची निर्मिती केलेली नाही नाही. यामुळे पिडीत शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

पिडित शेतकऱ्यांसाठी असलेल्या राखीव दोनशे प्लॉटसाठी सोयी सुविधा व्हाव्यात यासाठी गेल्या काही वर्षांपासून खा.हेमंत गोडसे सतत प्रयत्नशील होते. खा. गोडसे यांनी या कामासाठी अनेकदा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांची भेट घेत पीडितांसाठी राखीव असलेल्या प्लॉटवर सोयी सुविधा उभारण्यात येण्याची शासनाकडे मागणी केली होती. खा.गोडसे यांनी उद्योग विभागाच्या जिल्हा प्रशासनाकडेही पाठपुरावा सुरू होता. खा. गोडसे यांच्या प्रयत्नांना आता यश आले आहे. पिडित शेतकऱ्यांसाठी उपलब्थ असलेल्या प्लॉटवर सोयी -सुविधा उभारण्यासाठी उद्योग विभागाच्या जिल्हा प्रशासनाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी ८० कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला आहे.

## पुणे येथील 'महाडान्स शो' मध्ये धुळ्याच्या प्रतिक सैंदाणेने मारली बाजी

धुळे । प्रतिनिधी




पुणे येथे नुकताच महाडान्स शो आयोजित करण्यात आला होता. 'अगर डांस से है प्यार, तो महाडांसर बनने के लिये हो जाओ तैय्यार' या शिर्षकाखाली स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदरील महाडान्स या डान्सिंग स्पर्धेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून मुलांनी भाग घेतला होता. तसेच धुळे येथील दक्षता पोलिस कॉलनीतील प्रतिक सैंदाणे याने देखील या डान्स शो मध्ये सहभाग घेतला होता. प्रतिकच्या डान्सने पहिल्या फेरीपासूनच स्पर्धेच्या समिक्षकांची व प्रेषकांची मने जिंकली. तसेच त्याच्या उत्तम डान्सच्या आधारावर त्याला प्रथम पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

मराठी अभिनेत्री व कोरिओग्राफर फुलवा खामकर यांच्या हस्ते प्रतिकला महाडान्स या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक हिरो कंपनीची बाईक व चेक देण्यात आला. तसेच फुलवा खामकर यांनी प्रतिकला पुढील डान्स अशाच प्रकारे सुरु ठेवण्याचा अनमोल सल्ला दिला. प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे प्रतिकच्या घरच्यांनी, मित्र परिवार व इतर सहकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. प्रतिक हा अनेक वर्षांपासून डान्ससाठी मेहनत घेत होता. तसेच मेहनतीच्या आधारावरच हे यश प्राप्त केल्याचे प्रतिकने सांगितले आहे. प्रतिक हा नेहमी डान्स कॉम्पिटीशनमध्ये सहभाग घेत असतो. याआधी देखील प्रतिकला गोरेगांव, मुंबई, पुणे, जळगांव, धुळे विविध ठिकाणाहून डान्स कॉम्पिटीशनमध्ये पारितोषिके मिळाली आहेत.

या महाडान्स स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याने प्रतिक व प्रतिकची आजी लताबाई सैंदाणे, वडील रामकृष्ण सैंदाणे, आई कलावती सैंदाणे, काका भाऊसाहेब सैंदाणे, आबासाहेब सैंदाणे, काकू कविता सैंदाणे, भाऊ कार्तिक सैंदाणे, बहिण प्रियंका नेरपगार, पाहुणे राहुल नेरपगार यांनी आनंद व समाधान व्यक्त केले आहे. यावेळेस प्रतिकच्या पुढील वाटचालीसाठी रतन टिकाराम सैंदाणे, प्रा. घनश्याम सुर्यवंशी, महिला बचत गट अध्यक्षा निकिता सुर्यवंशी, इंजिनिअर खिलेश सुर्यवंशी, डॉ. आर्यन सुर्यवंशी, चौगांवचे सरपंच दादाजी महाले, शांताराम महाले, दिपक महाले, योगेशभाऊ गवळी, गजानन गृप, साईकृपाचे संचालक भाऊसाहेब सैंदाणे, प्रशांत सैंदाणे, रोहन सैंदाणे, वैभव सैंदाणे आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मोटरसायकल-बसच्या भीषण अपघातात तीन शिवसैनिकांचा मृत्यू

लासलगाव । वार्ताहर





शिरवाडे(वणी)फाट्यावर मोटरसायकल आणि परिवहन महामंडळाच्या बसच्या भीषण अपघातात तीन शिवसैनिकांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवारी रात्री ११ वाजेच्या दरम्यान घडली.या प्रकरणी बसचालक दिपक शांताराम पाटील यांना पिंपळगाव बसवंत पोलिसांनी अटक केली आहे.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार युवा सेना निफाड तालुका उपप्रमुख सुभाष माणिकराव निफाडे,निष्ठावंत शिवसैनिक मयूर चंद्रकांत निफाडे,नितीन भास्करराव निफाडे हे तिघे जण मोटारसायकल क्रमांक एमएच.१७ बी.आर.७९७२ ने जात असताना शिरवाडे(वणी)फाट्यावर नाशिककडे जाणाऱ्या परिवहन महामंडळाच्या बस क्रमांक एमएच २० बी.एल.२४६१ ने या मोटारसायकल स्वारांना जोरदार धडक दिली.या धडकेमुळे मोटारसायकल लांब फरफटत गेल्याने अपघातात मोटारसायकलवर बसलेले नितीन भास्कर निफाडे(३२),मयुर चंद्रकांत निफाडे(३५),सुभाष माणिकराव निफाडे (३६) यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातात मयत झालेले तिघेजण एकाच कुटुंबातील होते.या तिघांच्या अपघाती निधनामुळे त्यांच्या कुटुंबासह शिरवाडे वणी गावावर शोककळा पसरली.या घटनेमुळे मंगळवारी शिरवाडे वणी गाव व शिरवाडे फाटा बंद ठेवण्यात आले होते.या तिघांवर एकाच वेळी मंगळवारी सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.कुटुंबियांनी केलेल्या आक्रोशामुळे उपस्थितांचे डोळे देखील या प्रसंगी पाण्याने भरून आले.

**ग्रामस्थांनी महामार्ग रोखून धरला**

दरम्यान या घटनेनंतर संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी काही काळासाठी महामार्ग रोखून धरल्याने दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली होती. शिरवाडे वणी फाट्याजवळ योग्य पद्धतीने स्पीड ब्रेकर बसविण्यात आलेले नाहीत.त्यामुळे दोन्ही बाजूंनी येणारी वाहने वेगात जातात.वाहनांची गती कमी होत नसल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.अनेकवेळा मागणी करून सुध्दा या ठिकाणी सबंधित विभागाकडून उपाययोजना करण्यात आलेल्या नाही याठिकाणी उड्डाणपुल उभारण्याची मागणी ग्रामस्थांनी या वेळी केली.

---

अ‍ॅड.डि.सि. बोरसे, साक्री
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग साो. यांचे न्यायालयात**

फौ.कि. अर्ज. नं. ३१७/२०२३

गं.भा. अंजलीबाई भुऱ्या सोनवणे ........**अर्जदार**

**विरुध्द**

निबंधक जन्म - मृत्यु,

**तथा,**

म. ग्रामसेवक, ग्रामपंचायत जैताणे
ता. साक्री जि. धुळे ........**सामनेवाला**

मयत भुऱ्या नाना सोनवणे (मृत्यू दिनांक १८/०२/२०१८)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्टात दिनांक १६/०६/२०२३ रोजी कि. अर्ज नं. ३१७/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनीयम १९६९ कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्ममृत्यू नोंदणी नियम २००० मधील ९ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करणेबाबत वरील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील ता. ०३/०७/२०२३ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. न्यायदंडाधिकरी प्रथमवर्ग सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
स्थळ :- साक्री
दिनांक :- १६/०६/२०२३

(शिक्का)

**क. लिपीक**
**फौजदारी न्यायालय साक्री**

**सहा.अधिकारी**
**फौजदारी न्यायालय साक्री**

---

अ‍ॅड.संतोष बी. बोरसे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे.६वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे कोर्टात**

दि.कि. अर्ज नं ७२०/ २०२३

निलम दत्तात्रय ओझरकर वगैरे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही**

(कै. दत्तात्रय रामचंद्र सोनार वगैरे-मयत) ........**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि.२२/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. ७२०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. दत्तात्रय रामचंद्र सोनार व कै. मीनाबाई दत्तात्रय ओझरकर (सोनार) यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२७/०७/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर कोर्ट नं. ६ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक - २३/०६/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकुन**
**मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं**

आदेशावरुन
**अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं**

---

**प्रोसेस जमा**

अ‍ॅड.अक्षय ए. सगर, साक्री
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क्र. १२८/२०२३

सौ. जयवंताबाई त्र्यंबक पगारे,व इतर-३ उ.व.-७३, धंदा- घरकाम, राहणार-अंबापुर रोड, कन्हैयालाल सोसा.,
साक्री, ता.साक्री,जि.धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ........**सामनेवाला**

कै. बनिराम सोनु राउत - (मृत्यू दिनांक -०९/०४/२०२३)
........**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक २५/०४/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. बनिराम सोनू राउत यांचे दिनांक ०९/०४/२०२३ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. सौ. जयवंताबाई त्रंबक पगारे,
२. श्रीमती आशाबाई लक्ष्मण पगारे,
३. सौ. शुभांगी भ्र. योगेश पवार,
४. चि. संघर्ष लक्ष्मण पवार,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक २८/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि. २६/०४/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक - २६/०४/२०२३

(शिक्का)

**क. लिपीक**
**कामगिरी कारकुन, साक्री**

आदेशावरुन
**सहायक अधिक्षक**
**सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

## हस्ती स्कूलच्या फेन्सिगपटूंचे राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत घवघवीत यश

**न्यूज कॉलम**

### आरडाओरड करणाऱ्या दोन जणांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** लेनिन चौक परिसरात उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या निवासस्थानाबाहेर दारु पिऊन विनाकारण आरडाओरड करणाऱ्या विरोधात शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला. त्यात शंशाक संजय गौड (वय ३०) आणि रविंद्र रामलाल शमी (वय ४७) या दोघांचा समावेश आहे. ही घटना रविवारी मध्यरात्री घडली होती.

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा येथील फेन्सिगपटू दि. २४ व २५ जून २०२३ दरम्यान शुभ मंगल कार्यालय नाशिक येथे संपन्न झालेल्या राज्य स्तरीय तलवारबाजी स्पर्धेत सहभागी झाले होते. सदरची स्पर्धा नाशिक जिल्हा तलवारबाजी संघटना यांचे तर्फे आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेत हस्ती स्कूलच्या फेन्सिगपटूंनी चमकदार कामगिरी बजावली. यास्तव त्यांची आगामी राष्ट्रीय पातळीवरील फेन्सिग स्पर्धे साठी अभिनंदनीय निवड करण्यात आली. यात पुढील फेन्सिग प्रकार निहाय फेन्सिगपटूंचा समावेश आहे. तृषा पाटिल - सॅबर - सुवर्ण, अथर्व पाटिल - फॉईल - रजत व अभिराज कोळी, हर्ष पिंजारी, आरव कुकरेजा, प्राची खंडेराव, ओम जैन, आदित्य उपाध्याय, कृपाली रामोळे, व यती अग्रवाल - सर्व कांस्य पदक. या सर्व फेन्सिंगपटूंना स्पर्धास्थळी अर्जुन पुरस्कार प्राप्त ऑलिम्पिक पटू सईद जलालुद्दीन रिझवी, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक दुधारे, आंतरराष्ट्रीय फेन्सिंगपटू अजिंक्य दुधारे व अशोक आवारे या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करून कौतुक करण्यात आले. वरील सर्व यशस्वी फेन्सिगपटूंना हस्ती स्कूल क्रीडा विभाग प्रमुख प्रकाश खंडेराय, प्रशिक्षक विशाल पवार व क्रीडा शिक्षिका पुष्पा साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. तर शालेय समिती चेअरमन कैलास जैन तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम यांनी कौतुक केले. हस्ती स्कूल तर्फे अशा स्वरूपाच्या विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होणेस प्रेरित केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्यांचा विकास साधला जातो. सोबतच त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासास चालना मिळते.

## उपाययोजनेसाठी निधी कमी पडू देणार नाही : आ.पाटील

### नेर जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित होणार

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे तालुक्यासह जिल्हयात पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे धुळे तालुक्यात पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले असून ग्रामस्थांमध्ये पिण्याच्या पाणी टंचाईची भिती जाणवू लागली आहे. मात्र धुळे तालुक्यात दुर्देवाने लवकर पाऊस झाला नाही तर पिण्याच्या पाणी टंचाईला सक्षमपणे सामोरे जाणार असून टंचाई निवारणार्थ निधी कमी पडू दिला जाणार नाही. अशी माहिती देत आ.कुणाल पाटील यांनी तालुक्यातील सरपंच,ग्रामसेवक,पाणी पुरवठा विभागाचे प्रशासनातील अधिकारी यांनी आधीच उत्तम पध्दतीने नियोजन केल्याने त्यांचे कौतुक केले. ज्या ज्या गावांना येत्या दहा ते पंधरा दिवसात पाणी टंचाई उदभवण्याची शक्यता आहे त्या गावांसाठी त्वरीत विहीरी अधिग्रहित करावी, आवश्यक त्या गावांना टँकर सुरु करावेत तसेच विहीरींचे खोलीकरण करुन पाणी टंचाई दूर करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना आ.कुणाल पाटील यांनी बैठकित दिल्या. दरम्यान नव्याने उभारण्यात आलेली नेर जलशुध्दकरण केंद्र पूर्ण झाले असून येत्या दहा दिवसात सुरु करण्याच्याही सूचना आ.कुणाल पाटील यांनी यावेळी दिल्या.



धुळे तालुक्यातील पाणी टचांई निवारणार्थ आणि उपाययोजनासाठी आ.कुणाल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज दि.२६ जून रोजी धुळे जि.प.च्या कै.यशवंतराव चव्हाण सभागृहात धुळे तालुक्यातील सरपंच,ग्रामसेवक आणि पाणी पुरवठा विभागाचे अधिकार्यांच्या बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.कुणाल पाटील यांनी धुळे तालुक्यातील प्रत्येक गावांचा पाणी पुरवठ्याबाबतचा आढावा घेतला. यावेळी आढावा बैठकीत बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, धुळे तालुक्यातील पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना युध्दपातळीवर सुरु असून ११ गावांमध्ये खाजगी विहीरींचे अधिग्रहण मंजुर आहे. त्यात उभंड, नवलनगर, धमाणे, सावळी तांडा, जुन्नेर, निकुंभे, सैताळे, नावरी, भटाईदेवी, रतनपुरा, जुनवणे या गावांचा समावेश आहे. तर धुळे तहसिल कार्यालयाकडे विहीर अधिग्रहणासाठी उडाणे, बाबरे, लामकानी, आर्णी, तांडा कुंडाणे, कुळथे या ६ गावांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. बैठकित आ.कुणाल पाटील यांनी कापडणे, सोनगीर, लळींग, जुन्नर, दिवाणमळा, कुसूंबा, नेर, नगाव, बोरकुंड, रतनपुरा, मुकटी ,आर्वी,शिरुड,बोरीस,लामकानी, खेडे यांच्यासह धुळे तालुक्यातील प्रत्येक गावांतील पाणी पुरवठ्याबाबत आणि संभाव्य टंचाईबाबत माहिती जाणून घेतली. सरपंचांच्या मागणीनुसार पाणी टंचाई दूर करण्यासाठी विहीरींचे अधिग्रहण करणे, टँकर सुरु करणे, विहीरींचे खोलीकरण करणे, हॅण्डपंप बसविणे अशा आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याच्याही सूचना दिल्या.

टंचाई बैठकित नेर सरपंच गायत्री जयस्वाल यांनी नेर जलशुध्दीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून ते त्वरीत कार्यान्वित करावे अशी मागणी केली.यावेळी आ.कुणाल पाटील यांनी सांगितले की,नेर गावाचा पाणी प्रश्न सुटावा आणि शुध्द पाणी मिळावे म्हणून अक्कलपाडा प्रकल्पातून पाणी पुरवठा योजना व जलशुध्दीकरण केंद्र आपण मंजुर केले होते. सदर काम पूर्ण झाले असून येत्या दहा दिवसात या जलशुध्दीकरण केंद्रातून नेर ग्रामस्थांना पाणी पुरवठा केला जावा अशा सूचना आ.पाटील यांनी यावेळी दिल्या. त्यानुसार येत्या दहा दिवसात नेर जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित होणार आहे. टंचाई आढावा बैठकीला आ.कुणाल पाटील यांच्यासोबत एस.बी.पड्यार उपअभियंता ग्रा.पा.पु.,महेश ठाकुर प्र.कार्य.अभियंता ग्रा.पा.पु.,बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, कृऊबा संचालक साहेबराव खैरनार,व्ही. एन. वाघ, गटविकास अधिकारी एस.टी.सोनवणे, सहा.गटविकास अधिकारी रावसाहेब वाघ, जि.प.सदस्य अरुण पाटील, अशोक सुडके, सहाय्यक अभियंता जयदिप पाटील, शाखा अभियंता विजय गावीत, राहूल सैंदाणे, किर्तीमंत कौठळकर,राजीव पाटील,हरिष पाटील यांच्यासह तालुक्यातील सर्व सरपंच आणि ग्रामसेवक उपस्थित होते.

### रावेर येथील शाळेत मोफत गणवेश वाटप

**धुळे ।** तालुक्यातील रावेर येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या व पेनचे वाटप प्रथम लोकनियुक्त सरपंच दीपाली देवरे यांच्या हस्ते झाले. जि. प. शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. ग्रामसेवक घनशाम अहिरे, ग्रामपंचायत सदस्य खटाबाई पवार, राणी खैरनार, मनीष देवरे, माजी सरपंच मनोज बाविस्कर,मनीषा देवरे, गुडू पवार, दगा बैसाणे, बन्सीलाल अहिरे, प्रल्हाद पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष शरद देवरे, रुपाली देवरे, उपशिक्षिका मीनाक्षी बागूल, ज्योती पाटील, संभाजी देवरे, माजी प्रथम लोकनियुक्त सरपंच खैरनार, माजी सरपंच साहेबराव देवरे यांच्या हस्तेही मुलांना शालेय साहित्य वाटप झाले.

## पोलीस दलातर्फे जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन साजरी

### सायकल रॅलीच्या माध्यमातून जनजागृती

**धुळे । प्रतिनिधी**

जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पोलीस दलातर्फे संतोषी माता चौकातून सायकल रॅली काढून जनजागृती करण्यात आली. या ठिकाणी शाळेतील विद्यार्थी व सर्व पोलीस प्रशासन यांनी सायकलीवर अमली पदार्थ विरोधी फलक लावून मोठा सहभाग नोंदला.

या ठिकाणी उपस्थित विद्यार्थी यांच्यातर्फे एक छोटा अमली पदार्थ विरोधी ह्या विषयावर कार्यक्रम घेऊन प्रबोधन करण्यात आले. या ठिकाणी सायकल रॅली आयोजक मा. धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी धुळेकर जनतेला आवाहन केले की सर्वांनी अमली पदार्थापासून दूर राहायचे आहे हे आपल्या शरीरासाठी खूप घातक असतात व ज्याप्रकारे व्यसन करत आहात त्यामुळे युवा पिढी ही यांचा आदर्श घेऊन व्यसनाच्या आहारी पडत असतो त्यामुळे युवा पिढी वाचवायची असेल तर अमली पदार्थ याचा विरोध केलाच पाहिजे. ही रॅली संतोषी माता चौकातून निघाली व बारा पत्थर ते संपूर्ण आग्रा रोड वरून काढण्यात आली ह्या रॅलीसाठी वाहतूक नियंत्रण शाखेचे चांगल्या प्रकारे सहकार्य लाभले आहे व त्यांच्या मदतीने रॅलीच्या मार्गावर वाहतूक नियंत्रण ठेवण्यात आली. या ठिकाणी उपस्थित मा. पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक काळे सर, डी वाय. एस.पी ऋषिकेश रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, वाहतूक नियंत्रण शाखेचे,डॉक्टर व कर्मचारी आणि शाळकरी विद्यार्थी उपस्थित होते.



## बाळापूर जि. प. प्राथमिक शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा उत्साहात साजरा

**धुळे । प्रतिनिधी**

शिक्षणाचा खरा पाया बालवयातच मजबूत केला गेला पाहिजे. यामुळे पुढच्या शिक्षणाची प्रक्रिया सहज आणि सोपी होते. शाळेत पहिल्यांदाच येणार्या मुलांमध्ये शिकण्याची आवड निर्माण व्हावी. या विचाराने महाराष्ट्रात 'पहिले पाऊल- शाळापूर्व तयारी अभियान' राज्यसरकारने हाती घेतले आहे. या स्तरावर शाळा पूर्वतयारी अभियान राज्यस्तरीय मेळावा दुसरा धुळे तालुक्यातील बाळापूर जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी साजरा करण्यात आला आहे. मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक आणि भावनात्मक, भाषा विकास व गणनपूर्व तयारीसाठी आवश्यक कृतींचा सराव घेण्यात आला. एक ते सहा स्टॉल या ठिकाणी शिक्षकांच्या वतीने लावण्यात आले होते. सदर हा उपक्रम डायटच्या प्राचार्य व गटशिक्षणाधिकारी सुरेखा देवरे, विस्ताराधिकारी घुगे, केंद्रप्रमुख झाल्टे, यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेतील मुख्याध्यापक मनोज देवरे, शिक्षिका जनाबाई मराठे, अलका पाठक, शिक्षक सचिन सोनवणे, तुषार महाले यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच या शिक्षकांनी पालक वर्गांना विशेष मार्गदर्शनही केलं. या कार्यक्रमाला नगरसेवक संजय पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज सोनवणे, पत्रकार दीपक वाघ, राहुल पाटील, माधवराव पाटील, दिनेश पाटील, तसेच अंगणवाडी सेविका मदतनीस गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या नावीन्य उपक्रमाचा गावकऱ्यांनी कौतुकही केला.



## ज्ञानोपासना व बलोपासना या दोन गोष्टी राजर्षी शाहू महाराज यांना अभिप्रेत - व्ही. टी. गवळे

**धुळे । प्रतिनिधी**

ज्ञानोपासना व बलोपासना या दोन गोष्टी राजर्षी शाहू महाराज यांना अभिप्रेत होत्या असे प्रतिपादन जयहिंद शिक्षण संस्थेतील पर्यवेक्षक व्ही. टी. गवळे यांनी केले. राजर्षी छत्रपती शाहूमहाराज जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या अभ्विवादन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धुळे येथे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संजीवनी पाटील, पर्यवेक्षक एस. डी. मोरे, पर्यवेक्षक व्ही. टी. गवळे, पर्यवेक्षिका सौ. एम. व्ही. पिंपळीसकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर भाष्य करताना पर्यवेक्षक श्री. व्ही. टी. गवळे म्हणाले की, विद्यार्थीदशेपासूनच आपण ज्ञानोपासना व बलोपासना या दोन्ही गोष्टींना आपल्या जीवनात प्राधान्यक्रम दिला पाहिजे. शाहू महाराज खरोखर लोकराजे होते. राजा व ऋषी दोन्ही व्यक्तीमत्वांचे मिश्रण त्यांच्या चारित्र्यात दिसून येते. सक्तीचे प्राथमिक शिक्षण व समानतेची मूल्ये रुजवायला खरी सुरुवात शाहू महाराज यांनीच केली. आरक्षणाचे आदर्श सूत्र त्यांनीच देशाला दिले असे गवळे यांनी सांगितले. संयोजन श्रीमती भावना शिंदे, दिपाली पाटील यांनी केले.



## पुणे येथील कला प्रदर्शनात नाशिकच्या आम्रपाली जाधव-थोरात यांच्या पेंटींगचा गौरव

**नाशिक । प्रतिनिधी**

कलामहर्षी बाबुराव पेंटर आर्ट फाऊंडेशनतर्फे राष्ट्रीय कला प्रदर्शन आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी भारतातून ५०० कलाकृती सादर करण्यात आल्या. प्रदर्शन पुणे येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कलादालन येथे भरविण्यात आले होते.

बाबुराव पेंटर यांचे नातू अर्जुन मेस्त्री यांनी आयोजित या स्पर्धेमधे प्रोफेशनल कॅटेगरी आणि स्टुडन्ट कॅटेगरी ठेवण्यात आली होती. प्रोफेशनल कॅटेगरीमधे ॲबस्ट्रॅक्ट आणि कंटेंपररी आर्ट यात आम्रपाली जाधव-थोरात यांनी याच्या ३ बाय ४ फुट कॅन्व्हास वरील बुद्ध पेंटींगने पहिले पारितोषिक पटकविले आहे. बक्षिस म्हणून संस्थेने ट्रॉफी, ५०,००० रुपये रोख आणि प्रमाणपत्र दिले आहे. हे पारितोषिक बाबुराव पेंटर यांच्या कन्या विजयमाला यांच्या हस्ते देण्यात आले. नाशिक शहरातील सुप्रसिद्ध जाधव रबर स्टॅम्पचे संचालक राजेंद्र जाधव यांच्या त्या कन्या आहेत. कलाकुसरीचा वारसा जपलेल्या या कन्येचे जेष्ठांकडून अभिनंदन होत आहे.



## शिंगावे येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिंगावे येथे आमदार काशिराम पावरा यांच्या शुभहस्ते २० जून २०२३ रोजी विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यात प्रामुख्याने नागरी सुविधा योजने अंतर्गत कॉंक्रिटीकरण साठी १५ लाख रुपयांचा निधी, नागरी सुविधा योजना अंतर्गत फेवर ब्लॉक साठी १० लाख, ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत सामाजिक सभागृह साठी १५ लाख, आमदार निधीतून आदिवासी समाज मंदिरा साठी १० लाख व दलित वस्ती सुधारणा अंतर्गत १० लाख रु. निधी मंजूर करण्यात आला होता.

माजी शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा, प्रियदर्शिनी सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल, युवा उद्योजक चिंतनभाई पटेल, शिरपूर विधानसभा प्रमुख प्रभाकरराव चव्हाण, माजी नगरसेवक अशोक कलाल, जि. प. उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांच्या शिफारशीने निधी मंजूर झाला होता. आमदार काशिराम पावरा, जि.प. उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, पं. स. सदस्य चंद्रकांत दामोदर पाटील, सरपंच सौ. मंजुळाबाई गुलाबराव पाटील, उपसरपंच चंद्रकांत पाटील उर्फ भुराभाऊ, ग्रा.पं. सदस्य रवींद्र पाटील, गोविंदा थोरात, मंजुळाबाई पवार, माजी सरपंच आनंद भिल, मनोहर भिल, धीरज पाटील, संभा पाटील, भारती पाटील, मंगला बाई पाटील, स्वाती पाटील, अनिता पाटील यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले.



या प्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सूतगिरणी संचालक मधुकर सोमजी पाटील, विकासो संचालक आर. एस. पाटील, माजी सरपंच प्रताप आधार पाटील, भाजपा किसान मोर्चा तालुका अध्यक्ष लोटन हिम्मतराव पाटील, विकास सोसायटी व्हा.चेअरमन शशिकांत लक्ष्मण पाटील, माजी सूतगिरणी संचालक अशोक एकनाथ पाटील, माजी सरपंच शिरीष मनोहर पाटील, प्रा. अरुण पवार, ग्रामसेवक अविनाश बैसाणे, माजी उपसरपंच सुनील पाटील, जयवंत पाटील, बोरगांव सरपंच योगेंद्रसिंग सिसोदिया, सुभाष पाटील, विजू पाटील, छोटू पाटील, मिलिंद निकम, शत्रुघन भिल, बंटी गोसावी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिरपूर तालुका सरपंच महासंघाचे संपर्क प्रमुख, भाजयुमो तालुका सरचिटणीस तथा शिंगावे उपसरपंच चंद्रकांत पाटील उर्फ भुराभाऊ यांनी जि. प. उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांचे गावाचा विकास निधी मंजुरी साठी विशेष आभार मानले.

## होळनांथे येथे विद्यार्थी परिषदेची निवडणूक संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळनांथे येथे आर. सी. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये विद्यार्थी परिषदेची निवडणूक मुख्याध्यापिका सौ. भूमिका गर्ग यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. विद्यार्थीनी खूप उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी होऊन माध्यमिक विद्यार्थी विविध पदांसाठी निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. विद्यार्थी परिषदेचा प्रमुख विद्यार्थी व प्रमुख विद्यार्थिनी तसेच खेळ प्रमुख, सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख, संभाषण कार्यक्रमाचे प्रमुख, शिस्तप्रिय प्रमुख विद्यार्थी या विविध पदांसाठी विद्यार्थी निवडणूक आयोगाद्वारे निवडणूक संपन्न झाली. विद्यार्थीनी खूप उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी होऊन माध्यमिक विद्यार्थी विविध पदांसाठी निवडणुकीच्या रिंगणात उभे होते.

विद्यार्थी परिषद निवडणुकांमध्ये जे विद्यार्थी निवडून आलेले आहेत ते लवकरच जाहिर करण्यात येईल. अशा प्रकारे सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थी परिषदेची निवडणूक मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडली. त्यासाठी सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





बुधवार, दि. २८ जून २०२३

# बरसो रे मेघा मेघा! धुळ्यात पावसाची हजेरी
















धुळे

। दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले असताना महिनाभराच्या प्रतिक्षेनंतर धुळे शहरासह परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे शेतकरी सुखावला आहे. असे असले तरी दमदार पावसाची अजूनही प्रतिक्षा कायम आहे. शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी यंदाच्या हंगामातील पावसाने हजेरी लावली आहे. जून महिना संपत आला तरी देखील अद्यापही पावसाने हजेरी लावली नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या होत्या. परंतु आज झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. यामुळे काही ठिकाणी शेतकरी पेरणीच्या तयारीला लागला आहे. पावसाने शहर व तालुक्यातील काही भागांत हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच तालुक्यातील अनेक ठिकाणी अद्यापही पावसाची प्रतिक्षा कायम आहे. तर आजच्या पावसामुळे शेतकऱ्यांना शेतात पेरण्या करण्यासाठी चाल मिळाली आहे. सध्या महाराष्ट्रातील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. पावसाअभावी शेतकऱ्यांची कामे अडकले आहेत. सध्या मृग नक्षत्र सुरु आहे. अद्यापही या नक्षत्रात पाऊस झाला नाही. पेरणीसाठी शेतकरी पावसाची वाट पाहत आहेत. मात्र, पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत आहे. अशीच स्थिती राहिल्यास खरीप हंगाम वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना लागून राहिली आहे.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

बुधवार, दि. २८ जून २०२३ ६

# आषाढीसाठी पंढरी सजली, वारकऱ्यांचा मेळा भरला















आषाढी एकादशीसाठी पंढरपुर सज्ज झालं आहे. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरात जय्यत तयारी सुरू झाली आहे.विठ्ठल मंदिराला आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. राज्यभरातून आषाढीसाठी लाखोंच्या संख्येनं वारकरी पंढरपुरात दाखल होत आहेत.वारकऱ्यांच्या सोयीसाठी अनेक उपाययोजना पंढरपुरात करण्यात आल्या आहेत.महाराष्ट्रभरातून पालख्या पंढरीच्या दिशेनं येत असून अनेक पालख्या दाखल झाल्या आहेत.आषाढी सोहळ्यासाठी आदिशक्ती संत मुक्ताबाईंची पहिली मानाची पालखी पंढरपूरमध्ये दाखल झाली आहे.यंदा मुक्ताईंची पालखी २२ दिवसांत पंढरपुरात दाखल झाली.आपल्या लाडक्या विठुच्या दर्शनासाठी वारकरी आतूर झाले आहेत. पंढरीला जाऊन युगानयुगे विटेवरी उभ्या असलेल्या विठुलाच्या भेटीसाठी आतूर झालेला वारकरी ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता पंढरीत दाखल होत आहे. अनेक ठिकाणी प्रवचने आणि कीर्तने रंगली आहेत. चंद्रभागा नदीच्या किनारीही ज्ञानोबा-तुकारामांसह माऊली, माउली असा जप सुरू आहे. चंद्रभागेतील दशमीच्या स्नानाला विशेष महत्त्व असल्याने गुरुवारी (ता. ३) भल्या पहाटेपासूनच नदीवर वारकऱ्यांची स्नानासाठी दिवसभर झुंबड उडाल्याचे चित्र होते. गुलाल-बुक्क्यासह प्रासादिक वास्तूंची दुकाने, गृहोपयोगी साहित्य, लहान मुलांची खेळणी यांसह विविध प्रकारची दुकाने थाटल्याने खरेदीसाठी इथे गर्दी दिसत आहे.

ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील